**भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,2013 अंतर्गत कलम 19 अन्वये घोषणा.**

---

**भुसंपादन मौजे चौपाळे एस्केप चॅनल ता.जि.नंदुरबार एस.आर.क्रमांक 04/2018 दि.27.02.2019**

---

ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांनी खालील परिशिष्ट 1 मध्ये नमुद केलेल्या जमिनी भूमिसंपादन, पूनर्वसन व पूनर्वसाहत करतांना भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 कलम 11 अन्वये **मौजे चौपाळे एस्केप चॅनल ता. जि.नंदुरबार ल.पा.यो.मुख्य कालव्यावरील एस्केप चॅनलसाठी** या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्याची किंवा आवश्यक असण्याची शक्यता असल्या बाबतची प्राथमिक अधिसुचना **दिनांक** 14.07.2018 रोजी प्रसिध्द केली आहे. आणि

ज्याअर्थी उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांनी प्रसिध्द केलेल्या सदर प्राथमिक अधिसुचनेवर आजतागायत एकही हरकत प्राप्त झालेली नाही. अणि

उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे या बाबत समुचित शासन तथा जिल्हाधिकारी नंदुरबार यांची अशी खात्री झाली आहे. त्यामुळे उक्त अधिनियमाच्या कलम 19 पोटकलम (1) च्या तरतुदींन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थि, परिशिष्ट तिन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल क्षेत्र हे कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन निर्धारीत केले असल्याचे या द्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन योजनेचा सारांश परिशिष्ट चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (ग) अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, नंदुरबार भाग नंदुरबार यांना पदनिर्देशीत करीत आहे.

सदर जमिनींचे नकाशे व अन्य अभिलेख कार्यालयीन वेळेत उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांच्या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध राहतील.

Balaji D-M

बालाजी मंजुळे (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी नंदुरबार

**स्थळ :** **नंदुरबार**
**दिनांक :** 27 .02.2019

Scanned by CamScanner

## परिशिष्ट - एक

जमिनीचे वर्णन

मौजे चौपाळे ल.पा.यो.मुख्य कालव्यावरील एस्केप चॅनल तालुका नंदुरबार जिल्हा नंदुरबार

| अ.क्र. | गट नं. | संपादीत करावयाचे क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| | **मौजे चौपाळे ता.जि.नंदुरबार** | |
| 1 | 91/1ब | 0.05 |
| 2 | 91/1अ | 0.10 |
| 3 | 92/2 | 0.06 |
| 4 | 92/3 | 0.14 |
| | **एकुण** | 0.35 |

## परिशिष्ट दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत वितरण.

**प्रकल्पाचे नाव : ल.पा.यो.चौपाळे योजनेच्या मुख्य कालव्यावरील एस्केप चॅनल ता.जि.नंदुरबार**

**प्रल्पकार्याचे वर्णन**: मौजे चौपाळे एस्केप चॅनल ता.जि.नंदुरबार येथील जमीनींचे भुसंपादन करणे.

**समाजाला मिळणारे लाभ** : शेतक-यांना शेतीसाठी पाणी उपलब्ध होऊन लाभक्षेत्रातील शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणे अपेक्षीत आहे.

## परिशिष्ट- तीन

विस्थापन नाही.

## परिशिष्ट- चार

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.38 दिनांक 13 मार्च 2015 अन्वये सिंचन प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासुन सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

## परिशिष्ट-पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल : लागु नाही.

Balaji D. M

**स्थळ : नंदुरबार**
**दिनांक :** २७.०२.२०१९

**बालाजी मंजुळे,**(भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी नंदुरबार**

Scanned by CamScanner